**Article No: 1 (2019-20)**

**Name of Activity:** Online Marathi Vishwakosh Article

**Date and Time:** 31-08-2020

**Target Group:** All Marathi readers

**Name of Author :** Shanker Bhau Sathe.

**Name of Writer :**Dr. Prashant Gaikawad

**Organizer:** Maharashtra Rajya Marathi Vishwakosh Nirmiti Mandal Govt of Maharashtra.

**Link: https://marathivishwakosh.org/author/prashant-gaikwad/**

---

**Details of the Article:**

Shanker Bhau Sathe was younger brother of Anna Bhau Sathe He was born in Wategaon, district Sangali . He took inspiration from Anna Bhau Sathe in his literary career. He was famous for his autobiography ‘ Maza Bhau Anna Bhau’ also he had published many novels. For getting more information follow the above link.



साठे, शंकर भाऊ :(२६ ऑक्टोबर १९२५ – ११ मार्च १९९६). महाराष्ट्रातील शाहीर व साहित्यिक. अण्णाभाऊ साठे यांचे कनिष्ठ बंधू म्हणून शंकर भाऊ साठे हे संपूर्ण महाराष्ट्राला सुपरि चत आहेत. तसेच ते शाहीर व साहित्यिक म्हणूनही सुपरि चत आहेत. वाटेगाव जि. सांगली येथे शंकरभाऊंचा साठे कुटुंबात जन्म झाला. घरच्या प्रतिकूल परिस्थितीमुळे त्यांचे

शालेय शक्षण पूर्ण झाले नाही. अण्णाभाऊ साठे यांच्याकडून लेखनप्रेरणा घेऊन फुले-शाहू-आंबेडकरांच्या साहित्य व चळवळीचा वसा व वारसा अण्णाभाऊंच्या नंतर शंकर भाऊंनी चालवला. शंकर भाऊंनी १९४२ च्या स्वातंत्र्य चळवळीत तसेच संयुक्त महाराष्ट्र चळवळीत स क्रय सहभाग घेतला.

लाल बावटा व अण्णाभाऊ साठे कला पथकातून त्यांनी शाहीर म्हणून महाराष्ट्र , कर्नाटक, मध्यप्रदेश या राज्यांबरोबरच भारताच्या बहुतांशी भागात समाज परिवर्तनासाठी जनजागृती केली. साहित्यलेखन , अंधश्रध्दानिर्मूलन, अस्पृश्यता निवारण , दारूबंदी इत्यादी प्रबोधनात्मक उपक्रमाबरोबरच भारतीय कम्प्युनिष्ट पक्ष , काँग्रेस पक्ष, शेतकरी कामगार पक्ष , रिपब्लिकन पक्ष इत्यादी संस्थांशी त्यांचा जवळून संबंध आला.

*माझा भाऊ अण्णाभाऊ* (१९८०) हे त्यांचे आत्मकथनात्मक चरित्र प्र सध्द आहे. अण्णाभाऊंचे जीवन आ ण कार्य समजून घ्यायला हे आत्मपर लेखन महत्त्वाचे आहे. *एकच काडतूस* (१९८४), *सूड* (१९८५), *सगुणा* (१९८६), *घमांडी* (१९८६), *सावळा* (१९८६), *जग* (१९८६), *लखू* (१९८७), *बायडी* (१९९१), *सुगंधा* (१९९१), *बाजी* (१९९१), *काळा ओढा* इत्यादी कादंबऱ्या प्रका शत आहेत. त्यापैकी शामगाव या कादंबरीची काही पाने जिर्णावस्थेत उपलब्ध आहेत. यातील दोन कादंबऱ्यांची माहिती उपलब्ध नाही. शंकर भाऊंनी अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरीवर आधारीत *फ करा* या मराठी भाषेतील चत्रपटात फ कराच्या एका दरोडेखोर साथीदाराची भू मका केली होती. शंकरभाऊंनी केवळ मनोरंजनासाठी, दैववादी, कर्मकांडावर आधारीत लेखन न करता वास्तववादी, सामान्य माणसांच्या कार्यकर्तृत्वावर लहिले. अन्याया वरूध्द बंड करणाऱ्या , प्रामा णक, चारित्र्यसंपन्न, लढावू माणसांवर, त्याच्या जीवननिष्ठेवर लहिले. अन्यायाची चीड , शो षतांच्या वषयी हृदयात आपुलकी, वास्तव कथानक, प्रभावी घटना-प्रसंग, वचारप्रवण संवाद, वषम समाजव्यवस्थेवर घणाघाती प्रहार, हे त्यांच्या कादंबरी लेखनाचे वशेष नोंदवता येतील. त्यांनी रेखाटलेल्या नायक-नायिका ह्या बंडखोर , कष्टाळू, धाडसी, करारी बाण्याच्या, आपल्या भावनांना आवर घालणाऱ्या तसेच मानवी जीवनमूल्ये जोपासणाऱ्या आहेत.

संदर्भ : गायकवाड शरद, *अण्णाभाऊंचा भाऊ शंकर भाऊ साठे*, कोल्हापूर, २०१७.